VOLUME - VI, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2018
GENIUS - ISSN - 2279-0489 - IMPACT FACTOR - 4.248 (www.sjifactor.com)

१

# महाराष्ट्रातील जैन धर्म : उत्तर अणि दख्खनच्या सामाजिक सांस्कृतिक संबंधातील महत्वाचा दुवा

रुपेश मडकर
सहाय्यक प्राध्यापक, शा. ज्ञा. वि. महाविदयालय, औरंगाबाद.

"सच्चं भण गोदावरि! पुव्वसमुददेण सविया संति |
साताहण कुलसरिसं, जति ते कुले कुहं अत्थि |
उत्तरतो हिमवंती, दाहिणतो, सालिवाहणोराया |
समभार भरक्कंता तेण न पल्हत्थर पुहवी ||

अर्थात – पूर्व समुद्राची शपथ घेऊन हे गोदावरी खरे सांग की तुझ्या ठायी सातवाहन कुलासारखे दुसरे (राज) घराणे आहे काय? (अर्थात नाही) (कारण सातवाहन घराणे इतके मोठे आहे की) पृथ्वीचा समतोल उत्तरेला हिमालय व दक्षिणेला सातवाहन असल्यामुळे साधला आहे व त्यामुळेच ती स्थिर आहे"

महाराष्ट्रातील पैठण येथे राजधानी असलेल्या सातवाहनांचा गौरवपूर्ण उल्लेख इ.स. च्या पहिल्या शतकात उत्तर भारतात रचना झालेल्या *बृहतकल्पसुत्रभाष्य* या जैन ग्रंथात वरील प्रमाणे येतो. यावरुन सातवाहन तत्कालीन भारतातील एक प्रबळ सत्ता होती हे जसे स्पष्ट होते तसेच जैन धर्मीयांचा या प्रदेशाशी थेट संबंध होता हे ही स्पष्ट होते. रा.श्री. मोरवंचीकर यांच्या मताप्रमाणे, मगध राज्यात दुष्काळ पडल्यामुळे जैन मुनींचा जो संघ दक्षिण भारतात आला त्याचे नेतृत्व करणारे भद्रबाहू हे जैन मुनी पैठण येथील असावेत असे नमूद केले आहे[पहा मोरवंचीकर २०१८:५५] तसेच कलकाचार्य कथानकाप्रमाणे कलकाचार्य (जैनाचार्य) यांनी सातवाहनांच्या मदतीने उज्जैनमधील शकांचा पराभव केल्याचा उल्लेख आला आहे. याचबरोबर सातवाहन राजास पर्युषण पर्वात सहभागी होता यावे म्हणून कलकाचार्यांनी पर्युषण पर्वाची तिथी राजाच्या विनंतीनुसार बदलल्याचे यात म्हटले आहे. यासारख्या अनेक कथांनी जैन भांडारे समृध्द आहेत. कथा, कहाण्या, चुर्नीकथा, चरित्रे, धार्मिक वाड्मय तसेच पंथीय गतिविधींची नोंद / लिखाण करण्याची जैनांची परंपरा लक्षणीय असल्याचे स्पष्ट करुन रोमिला थापर यांनी जैनांमधील विविध पंथांच्या गतिविधींचा मागोवा घेतल्यास या कथा, चरित्रांमधून इतिहासास आवश्यक असे काही संदर्भ मिळू शकतात हे नमूद केले आहे. [पहा थापर २००२:४७२]. या कथांवरुन सातवाहन-पैठण-जैन असा त्रिकोण उभा राहतो, म्हणजेच सातवाहन काळात पैठण हे जैनांचे महत्वाचे केंद्र म्हणून उदय पावले होते व त्यामुळेच तेथे तत्कालीन जैनाचार्य भेट देत असावेत हे "बृहतकल्पसुत्रभाष्य", "पिण्डनिर्युक्ती", "गच्छाचारवृत्ती", "वसुदेवहिंडी", आदी प्राचीन व जिनसेनाचे "आदिपुराण", "प्रबंध चिंतामणी", व "विविधतिर्थकल्प" आदी मध्ययुगीन ग्रंथात पैठणचे जे उल्लेख आले आहेत त्यावरुन हे स्पष्ट होते.

इ.स. पूर्व सहाव्या शतकात भारताच्या पूर्व भागात उदयास आलेला जैन धर्म काळाच्या कोणत्या टप्प्यावर महाराष्ट्रापर्यंत आला हे पाहणेही उदबोधक ठरते. अर्थात, एका विशिष्ठपध्दतीच्या धार्मिक मार्गास अनुसरणा-या लोकसमुहाला जैन हा शब्द प्रथम कधी योजला गेला याबददल स्पष्टता नसली तरी इ.स. पूर्वीच्या पहिल्या शतकांमधे हा शब्द प्रचलित झाला असावा असे पॉल डुंडास हे अभ्यासक स्पष्ट करतात [पहा डुंडास २००२ :०३]. इच्छांवरती / इंद्रीयावरती विजय मिळविणा-या मानवी शिक्षकांना "जिन" म्हणजे विजय मिळविणारे हे बिरुद दिल्या गेले. यांनी 'खरे ज्ञान' प्राप्त केले व जन्म मृत्यूच्या चक्रातून स्वत:स मुक्त केले. या "जिन" शब्दातून "जैन" हा संस्कृत शब्द आला. या आध्यात्मिक विजेत्यांनी स्पष्ट केलेला त्रिरत्नांचा म्हणजेच सम्यक ज्ञान, सम्यक दृष्टी व सम्यक चारित्र्य हा मार्ग अनुसरणा-यास जैन म्हटलेजाते. [डुंडास २००२]या सुरुवातीच्या काळापासूनच जैन धर्माचा महाराष्ट्राशी व पर्यायाने दख्खनशी घनिष्ठ संबंध राहीला



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

आहे. महाराष्ट्र व दखखन मध्ये जैन धर्म दोन प्रकारे पसरला व स्थिरावला. एक म्हणजे उत्तरेकडून वा पश्चिमेकडून वेगवेगळ्या कालखंडात जैन धर्मिय दखखनमध्ये आले व स्थायिक झाले. दुसरे या लोकांच्या प्रभावातून स्थानिक अन्य धर्मिय / पंथिय लोकांनी जैन धर्म स्विकारला. यातील कोणत्याही परिस्थितीत दखखनचा उत्तरेशी सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार होणे अपरिहार्य होते. सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार एखादया निर्वात पोकळीत घडत नसतात तर त्यास समाजातील राजकीय-आर्थिक बाजूंचा तेवढाच जबाबदार कोन असतो, त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. म्हणजेच, भारतातील वेगवेगळया कालखंडात तत्कालीक राजकीय-आर्थिक परिस्थितीला साद-प्रतिसाद देण्यातून ज्या उलथापालथ घडून आल्या त्यातून जैन धर्म सुटलेला नव्हता. महाराष्ट्र व दखखनचा जैन धर्मियांशी जो संबंध आला व त्यातून जे सामाजिक-सांस्कृतिक व्यवहार/परस्पर संबंध निर्माण झाले ते तपासणे हा या शोध लेखाचा हेतू आहे. वरती पाहिल्याप्रमाणे जैन धर्मियांच्या सुरुवातीच्याच ग्रंथामध्ये सातवाहन व पर्यायाने दखखनशी असलेला संबंध स्पष्ट होतो. महाराष्ट्रातील जैन धर्माचा या कालखंडातील थेट पुरावा म्हणून पुणे जिल्हयातील पाले येथील गुहेत इ.स.पू. पहिल्या शतकातील जो कोरीव लेख सापडला आहे त्याची सुरुवातच "णमो अरिहंताणं" अशी होते, "णमो अरिहंताणं" हा शब्द बौध्द धर्मापेक्षा जैन धर्माशी कसा जोडलेला आहे हे विराज शहा स्पष्ट करतात [पहा विराज शहा २००४:२४३] प्राचीन कालखंडात सातवाहन राजवटीत दखखनचे रोम साम्राज्याशी थेट समुद्रमार्गे व्यापारी संबंध निर्माण झाले होते याचे पुरावे महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या उत्खननातून मिळाले आहेत. त्याचबरोबर टॉलेमीचे "जिओग्राफी", "पेरिप्लस ऑफ युरेथ्रियन सी", यासारख्या ग्रंथात येथील बंदरांचे, बाजारपेठांचे, पैठणचे उल्लेख सापडतात. जैनांच्या बृहतकल्प भाष्य या समकालीन ग्रंथात सुपारक या बंदराचे तसेच का... चे उल्लेख अढळतात. याचाच अर्थ या व्यापाराचा लाभ पदरात पाडून घेण्यासाठी व्यापाराची पार्श्वभूमी असलेल्या जैन धर्मातील मोठ्या गटाचे या व्यापारी पेठांच्या ठिकाणी वास्तव्य होते हे स्पष्ट होते यासाठी अगदी इ.स.पूर्व पहिल्या दुस-या शतकापासून जैन धर्मीयांचे उत्तरेतून दखखनेत व महाराष्ट्रात स्थलांतरे होत होती हे लक्षात येते. यामुळेच समकालीन बौध्द लेण्यांबरोबरच महाराष्ट्र व दखखनमधील विविध ठिकाणी जैन धर्मियांच्या लेण्यासुध्दा प्रकर्षाने दिसतात. या लेण्यांची ठिकाणे (Locations) ही प्रामुख्याने प्राचीन व्यापारी मार्गावर आहेत तेर ही तत्कालीन महत्वाची बाजारपेठ होती, तेर व उस्मानाबाद येथे सहाव्या सातव्या शतकातील लेण्या आढळतात. महाराष्ट्राच्या/दखखनच्या सामाजिक संरचनेत बौध्द धर्माबरोबरच जैन धर्माने महत्वाची भर घातलेली आहे.

जैन धर्म व व्यापारी वर्ग हा अन्योन्य संबंध लक्षात घेतला तर याचे नागरी (Urban) स्वरुप समजते तसेच या धर्माचे अश्रयदा... हे प्रामुख्याने व्यापाराशी संबंधित असल्याचे विविध मंदिरे व तेथील दानपत्रे /कोरीवलेख इत्यादी वरुन स्पष्ट होते. इ.स. च्या नवव्या व दहाव्या शतकापासून दक्षिणेकडे या धर्माची लोकप्रियता वाढल्याचे लक्षात येते या काळात नवी केंद्रे निर्माण झाली, ग्रंथ व त्यातून ठळक होत जाणा... भूगोल पश्चिम व दक्षिण भारताचा आहे. दक्षिणेकडे राष्ट्रकुट, गंग, काकातीय आदी राज घराण्यांनी या धर्मास आश्रय दिला. राष्ट्रकुटांम... तर अनेक राजांनी जैन धर्म स्विकारला उदा. अमोघवर्ष. विराज शहा यांच्या मताप्रमाणे दक्षिणेकडे या कालखंडात जैन धर्माच्या ल... ते वाढ होण्याची काही महत्वाची तत्कालीक कारणे आहेत, त्यात दक्षिणेकडे व्यापाराचे झालेले पुनरुज्जीवन हा घटक त्या महत्वाचा मानता... या काळात चोळांचा पूर्वीय देशांशी महत्वाचा व्यापार चालू होता. या व्यापारात सहभागी होण्यासाठी व दक्षिण-उत्तर व्यापाराचा फाय... घेण्यासाठी अनेक श्रेण्या (Guilds) अस्तित्वात आल्याचे विराज शहा दर्शवितात. इ.स. ११३५चा कोल्हापूरचा कोरीव लेख वीर बंज... तर देसींगा बोरगावचा ११५० चा कोरीव लेखात ऐहोळ च्या ५०० स्वामींचा उल्लेख आहे. मुम्मुरीदंड व उभयनन्नदेसी या श्रेण्यांचा उल्ले... मलकावथेच्या ११६६ च्या कोरीव लेखात आला आहे. या श्रेण्या शक्तीशाली असत त्यांना स्वत:ची नाणी पाडण्याचाही अधिकार असाय... स्थानिक व्यापारापासून अन्य देशांशी व्यापार करणा-या श्रेणी अशी त्यांच्यातही विभागणी होती. उभयनन्नदेसी ही अन्य देशांसोबत व्या... करत असे. अनेक मंदिरांच्या /बसदींच्या उभारणीत या श्रेणींमधील श्रेष्ठींचा सहभाग असे[पहा विराज शहा २००४:२५७].

व्यापाराबरोबरच बौध्द धर्माचा भारतातून –हास होणे ही बाब सुध्दा दक्षिणेतील जैन धर्मवाढण्यामागचे एक कारण असावे असे त्य... नमूद केले आहे. या भागात बौध्द धर्म लोकप्रिय होता तोपर्यंत जैन धर्माच्या प्रसाराला मर्यादा होत्या, परंतु सातव्या आठव्या शतकानंतर ब...



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

धर्माचा झपाटयाने –हास झाला. बौध्द धर्माला स्वत:चे "ब्राम्हणीकरण" रोखण्यात आलेले अपयश व यासारखी अन्य कारणे त्यामागे असावीत. परंतु जैन धर्मियांनी "ब्राम्हणीकरणाला" केलेला जोरदार विरोध व स्वत:च जैन परंपरेत रामायण, महाभारत आदींची केलेली रचना आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यात त्यांना उपयोगी पडली असावी असे शहा स्पष्ट करतात. व्यापाराबरोबरच ११व्या शतकानंतर उत्तरेकडे झालेले सत्तांतर व मुस्लिम आक्रमकांपासून बचावासाठी विशेषकरुन आलाउद्दीन खिलजीच्या आक्रमणानंतर राजस्थान-गुजराथ भागातून अनेक जैन धर्मियांनी दक्षिणेकडे स्थलांतर केल्याचे मनीषा पाटील या अभ्यासात दाखवून देतात. यामधे दिगंबर जैनांचा मोठया प्रमाणात सहभाग होता. बाघेलवार, सैतवाल, हुम्मड, खंडेलवाल, पद्मावती पल्लीवार, गोलापूर्व, पंचम, नेवा, अगरवाल व परवार असे अनेक गट या काळात दक्षिणेकडे स्थलांतरीत झाले. बाघेलवारांचा गट महाराष्ट्रच्या विदर्भाकडे आला व तेथेच स्थायिक झाला. यातील पुनाजी खाटोड, जो चित्तौडच्या राणा राजसिंगचा मंत्री होता, त्याच्यासोबत १५० बाघेलवार कुटुंबांनी दक्षिणेकडे इ.स.१३२० मधे स्थलांतर केले. ही कुटुंबे महाराष्ट्रातील विदर्भाच्या परिसरात स्थायिक झाली या स्थलांतरामागच्या अनेक कथा कहाण्या सांगीतल्या जातात व अशी अनेक स्थलांतरे या काळात झाली. यातून महाराष्ट्र व दखखनचे आजचे सामाजिक-सांस्कृतिक स्वरुप घडत गेले. या काळात दक्षिणेकडेही जैन धार्मापुढे अनेक संकटे निर्माण झाली. उत्तरेकडून मुस्लिम आक्रमण तर दक्षिणेकडे अलवार पंथिय तर कर्नाटकात वीरशैव-जैन धर्म असे संघर्ष सुरु झाले यातून जैन धर्माचे अस्तित्व आक्रसत गेले [मनीषा पाटील २००३]. धर्माचे अस्तित्व टिकवण्यासाठी स्थलांतरे झाली असावीत असे स्पष्ट करतांना पाटील कर्नाटकातील मुडबिद्री व मलखेडच्या भट्टारक परंपरेतून कारंजा हे विदर्भातील दिगंबर जैन धर्माचे महत्वाचे पीठ निर्माण झाल्याचे नमूद करतात. भट्टारकांचे कार्यसुध्दा त्याचप्रकारचे होते. धार्मिक यात्रा करणे, मूर्तीची स्थापना करणे, शास्त्र भांडारांची उभारणी करणे व लोकांच्या मनातील धर्म भावनेस टिकवून ठेवणे यासारखे कार्य करुन भट्टारकांनी या अडचणीच्या काळात धर्माचे अस्तित्व टिकवून ठेवल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. या काळात गुजराथ, माळवा, महाराष्ट्र, कर्नाटक या ठिकाणी दिगंबर जैन पंथाची अनेक पीठे निर्माण झाली ज्यांनी धर्मतगवून ठेवण्याचे कार्य केल्याचे त्या नमूद करतात. ईडर, सोजित्र आणि सुरत (गुजराथ), जयपूर व नागौर (राजस्थान), दिल्ली व ग्वाल्हेर (उत्तर भारत), धार व सगवार (माळवा), कारंजा, लातूर व कोल्हापूर (महाराष्ट्र), मलखेड, मुडबिद्री, हुम्मच, कारकल आणि श्रवणबेळगोळ (कर्नाटक) अशी दिगंबर जैनांची २० पीठे निर्माण झाली.



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

(नकाशा क्र-१ दिगंबर जैन पंथाची महत्वाची भट्टारक पीठे व महत्वाच्या बाजारपेठा, १७ वे शतक. नकाशा प्रमाणानुसार नाही)

या पीठांमधे चांगला परस्पर समन्वय असल्याचे पाटील दाखवून देतात. या पीठांनी तसेच भट्टारकांनी शास्त्र भांडार निर्माण करण्याचे जे कार्य केले त्यातून मोठया प्रमाणात सांस्कृतिक दळणवळण होत राहीले. अनेक भट्टारक व त्यांचे शिष्य हे स्वत: चांगले लेखक असल्यामुळे त्यांनी अनेक ग्रंथांची रचना केली व सामान्य श्रावकांनाही ग्रंथदान करण्याची प्रेरणा दिली यातून ही भांडारे समृध्द झाली. यातील अनेक श्रावक हे व्यापारी असल्याने त्यांनी भांडारांना मोठी मदत केली तसेच ग्रंथ तयार करवून घेतले. अनेक ठिकाणी चित्रकार व लेखाकारांना आश्रय देवून ग्रंथांवर चित्रे काढून घेतली. यातील अनेक श्रावक राजस्थान, गुजराथ येथून आलेले असल्याने त्यांनी निर्माण केलेल्या चित्रांवर राजस्थानी, सिरोही व मुघल चित्रकलेचा प्रभाव दिसतो. तसेच चित्रे, पट (उदा. पंचकल्याणक पट, कारंजा) ही गुजराथेत रंगवली व नंतर ती विदर्भात आणल्याचे त्या दाखवून देतात. विज्ञप्तीपत्रे ही राजस्थान गुजराथमधे तयार केली व नंतर त्यांचे ठिकाण बदलले वा ती या स्थलांतरीतांबरोबर विदर्भात आली.

विदर्भातील महत्वाचे केंद्र म्हणून कारंजाचा उदय १६व्या शतकात झाला. त्याचे व्यापारी महत्व मुघल कालखंडात वाढले. बु-हाणपूर-सुरत-कारंजा-औरंगाबाद असा चौकोन तयार झाला. यांचे बाजारपेठा म्हणून महत्व वाढले होते. स्वत: औरंगजेब व मुघलांचे महत्वाचे अनेक सरदार २५ वर्ष दक्षिणेत असल्यामुळे या ठिकाणांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. या सर्व बाजारपेठा मराठयांनी लुटल्या होत्या यावरुनही त्यांचे आर्थिक महत्व लक्षात येते. कारंजा या नगराचे एकीकडे बु-हाणपूर-सुरतशी जसे व्यापारी संबंध होते तसेच ते ईडर-सुरतशी धार्मिक पीठ म्हणून जवळचे संबंध होते. कारंजा येथील पीठाचे अनेक भट्टारक आपले मुळ गुजराथेत सांगतात. ब्रम्हगुणदास या ब्रम्हजिनदास यांच्या शिष्याने कारंजास येवून मराठीत श्रेणिकचरित्र हे मराठी ओवीबध्द चरित्र लिहीले तसेच क्षमागीत, विंचूगीत, गा-हाणे, रामचंद्र हळदूळी असे तत्कालीन मराठीतील लेखन प्रकारात लेखन केले आहे. ब्रम्हगुणदासप्रमाणे अनेक भट्टारक व त्यांच्या शिष्यांनी मराठीत लेखन केले. हे पंथीय परंपरेतील लेखन असले तरी त्याचे एक विशिष्ट महत्व आहे. मराठी भाषेच्या अभ्यासासाठी हे चरित्र महत्वाचे असल्याचे डॉ. सुभाषचंद्र आक्कोळे स्पष्ट करतात, त्याचबरोबर महाराष्ट्रात झालेले मुस्लिम आक्रमण तसेच वैदिक व वारकरी हे दोन्ही जैनांच्या विरोधी असल्यामुळे धर्म प्रसार जरी साध्य झाला नाही तरी आहे तो धर्म टिकवून ठेवणे महत्वाचे असल्यामुळे अशा प्रकारच्या चरित्रलेखनाची गरज त्याकाळी निर्माण झाल्याचे व त्यातून स्थानिक भाषांमधून लेखन वाढल्याचे डॉ. अक्कोळे नमूद करतात [डॉ. अक्कोळे १९६४].पंथीय लेखनातून मराठी भाषेला दिलेले महत्वाचे योगदान म्हणून या काळातील भांडारातील लेखन पाहता येते. सामान्य श्रावकांमधे धर्माचे अस्तित्व टिकवून ठेवायाचे असल्यामुळे स्थानिक भाषांचा वापर केला गेला.

**निष्कर्ष :**

व्यापाराच्या निमित्ताने मोठया प्रमाणात झालेली स्थलांतरे व व्यापारी वर्गाने दिलेल्या आश्रयामुळे दखनमध्ये बौध्द धर्माबरोबरच जैन धर्माचे आगमन झाले. यातून अनेक प्रकारची लेणी शिल्पे निर्माण झाली. व्यापारातून आलेल्या समृध्दीचे प्रतिबिंब तत्कालीन कला व संस्कृतीमधून पाहता येते. मध्ययुगामधे अन्य कारणांमुळे जी स्थलांतरे झाली त्यातुनही भाषा, संस्कृती यांची देवाणघेवाण उत्तर व दक्षिण प्रदेशात होत राहीली. भाषिक योगदानाबरोबरच अनेक ग्रंथावर काढलेली चित्रे, विविध पट, विज्ञप्तीपत्रे व भित्तीचित्रे यांमधे राजस्थानी, मुघल, सिरोही शैलीचा संगम होवून विशिष्ट प्रकारची दखखन शैली विकसीत झाली. विदर्भातील जैन पीठांचा उत्तर व दक्षिणेकडील पीठांशी अत्यंत महत्वाचा संबंध होता या जैवीक संबंधातून भाषा, चित्रकला, स्थापत्य, खादय पदार्थ आदी सर्वच बाबींची देवाणघेवाण होत होती यातून महाराष्ट्रातील जैन धर्माचे वैशिष्टयपूर्ण सामाजिक-सांस्कृतिक जीवन आकाराला आले. हे सामाजिक-सांस्कृतिक संचित एकटया जैन धर्मापुरते मर्यादित नसून सर्व दखनच्याच सामाजिक-सांस्कृतिक संचिताचा महत्वाचा भाग राहिला आहे.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

**संदर्भ :**

१. अक्कोळे, सुभाषचंद्र (१९६४) *श्रेणिकचरित्र* (संपा.), जीवराज जैन ग्रंथमाला, सोलापूर.

२. डुंडास, पॉल (२००२) : द *जैन्स*, रुटलेज, न्युयॉर्क.

३. थापर, रोमिला (२००२) : अर्लि इंडिया फ्रॉम द ओरीजीन्स टू एडी १३००, पेंग्विन, दिल्ली.

४. पाटील, मनीषा (२००३) : इलूस्ट्रेटेड मॅन्युस्क्रिप्टस ॲण्ड पेन्टींग्ज फ्रॉम दिगंबर जैन भांडाराज ऑफ विदर्भ, महाराजा सयाजीराव विदयापीठ, बडौदा यांना सादर केलेला पी.एचडी. प्रबंध.

५. मोरवंचीकर, रा.श्री. (२०१८) : प्रतिष्ठान ते पैठण, विदया बुक्स, औरंगाबाद.

६. शहा, विराज (२००४) : अलोका पराशर-सेन (संपा.) केवल-बोधी बुध्दिस्ट ॲण्ड जैन हिस्ट्री ऑफ दि डेक्कन, भारतीय कला प्रकाशन,दिल्ली.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad